| | |
|---|---|
| MHKO100010142022 | **नियमीत दिवाणी दावा क्र. २३४/२०२२**<br><br>गजबर ईब्राहीम परीट वगैरे.<br>//वि//<br>बियामा मिरासो परीट. |

**निशाणी क्र. ३४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन असे की, मौजे हलकर्णी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथील नगरभूमापन क्र.१३१४, क्षेत्र ३८४ चौ.मी. पैकी १/२ हिस्याचे क्षेत्र सदर मिळकत ही तुर्तातुर्त मनाई मागत असलेली मिळकत आहे. वर नमुद मिळकतीपैकी १९२ चौ.मी. इतके क्षेत्र प्रतिवादीचे मालकी हक्काचे व कब्जेवहिवाटीचे क्षेत्र आहे. सदर मिळकत प्रतिवादीला तिचे पती मिरासो यांच्या मृत्युनंतर वारसाहक्काने प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतीच्या उत्तर बाजुस पूर्वी वादी क्र.४ यांची निम्या क्षेत्रात वहिवाट होती व उरलेल्या निम्या क्षेत्रात प्रतिवादी यांची मालकी हक्काची वहिवाट होती व आहे. प्रतिवादीने कोणत्याही व कसल्याही प्रकारे मृत्यूपत्र अथवा हक्कसोडपत्र वादी यांच्या हक्कात केले नव्हते व नाही.

०३. प्रतिवादी ही विधवा वयोवृध्द महिला असल्याचा गैरफायदा घेऊन तिच्या वरनमुद मिळकतीमधील अर्धा हिस्यात वादी क्र.१, २ व ४ हे खड्डे काढून दावा मिळकतीमध्ये बांधकाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अनेक वेळा प्रतिवादीने त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु वादी हे प्रतिवादीच्या वयोवृध्द असल्याचा गैरफायदा घेऊन बांधकाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादीला वादी हे न्यायालयाच्या मनाई हुकूमाशिवाय सदर बांधकाम बंद करणार नाहीत याची खात्री झाल्याने प्रतिवादीने वादी अथवा तर्फे इसम यांनी प्रतिवादी यांच्या हिस्याच्या क्षेत्रात अतिक्रमण करुन बांधकाम करु नये म्हणुन सदर तुर्तातुर्त मनाई अर्ज वादी यांचेविरुध्द दाखल करणे भाग पडले आहे.

०४. प्रतिवादी मागणी करते त्याप्रमाणे वादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई

आदेश झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट मनाई आदेश न दिल्यास प्रतिवादीला दावा मिळकतीतील आपल्या मालकी कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा होणार आहे. तसेच, वादी यांनी दावा मिळकतीमध्ये केलेल्या बांधकामामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. यामुळे प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे असे मोठे नुकसान होणार आहे. प्रतिवादीची सकृतदर्शनी केस असून न्यायाचा समतोल तिच्या बाजुने आहे. सबब, प्रतिवादीचा अर्ज मागणीनुसार मान्य करण्याची विनंती केली.

०५. याऊलट, वादींतर्फे निशाणी क्र.३५ येथे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांच्या कथनात अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारलेला आहे. त्यांनी पुढे कथन केले की, प्रस्तुत अर्जात प्रतिवादीने नमुद केलेले क्षेत्र १९२ चौ.मी. तिच्या मालकी व वहिवाटीचे केव्हाही नव्हते व नाही. प्रतिवादीने मयत पती मिरासो यांच्या मृत्युनंतर तिला सदर मिळकतीची १९२ चौ.मी. क्षेत्राची मालकी मुस्लीम कायद्याने प्राप्त होत नव्हती व नाही. पतीच्या मृत्युपश्चात तिचा केवळ १/४ हिस्सा तिला प्राप्त होतो आणि वादींना ३/४ हिस्सा प्राप्त होतो. प्रतिवादीने त्याप्रमाणे मागणी केलेली नाही. केवळ वादींना त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीचे मृत्युपत्र व हक्कसोडपत्र वादी यांच्या हक्कात करुन दिल्याचे कथन दाव्यात केलेले आहे. वादींनी दावा मिळकतमधील वादी आणि प्रतिवादीचे क्षेत्र तुटक करुन मिळावे अशी मागणी केलेली आहे. प्रस्तुत अर्जात ज्या क्षेत्रावर तात्पुरती मनाई मागितलेली आहे त्या क्षेत्राची चतुःसिमा नमुद केलेली नाही. प्रतिवादीचा दावा मिळकतीमध्ये दिनांक १५/०९/१९९८ रोजी पासुन केव्हाही कोणत्याही प्रकारची वहिवाट नव्हती व नाही. वादी सि.स.क्र.१३१४ मध्ये त्यांची जुनी ५ घरे बांधून कुटूंबासह राहत आहेत. वादी क्र.२ व ५ यांनी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मंजुर झाल्याने त्यांची जुनी घरे पाडून त्याठिकाणी नवीन घरे बांधली आहेत. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जासोबत दाखल केलेले फोटो खोटे आहेत. वादी हे त्यांच्या पूर्वीच्या जुन्या घराचे बांधकाम पाडून त्याचठिकाणी बांधलेल्या नवीन घराच्या दक्षिण बाजुस प्रतिवादीच्या पतीच्या मृत्युनंतर तिला येणारे मुस्लीम

कायदयाप्रमाणेचे क्षेत्र हे शिल्लक आहे. वादींच्या घरांचे बांधकाम पुर्ण झाले असल्याने प्रतिवादीच्या अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०६. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीने असे शाबीत केले काय की, तिच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | होय. |
| २. | प्रतिवादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल तिच्या बाजुने आहे ? | होय. |
| ३. | प्रतिवादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास तिचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

०७. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीने अर्जामध्ये नमुद दावा मिळकतीमध्ये वादी यांनी कोणत्याही प्रकारचे कसलेही बांधकाम करु नये, तसेच तिच्या मालक नात्याच्या कब्जेवहिवाटीस वादी अथवा तर्फे इसम यांनी कोणत्याही प्रकारची हरकत व अडथळा करु नये अशा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे. प्रस्तुतचा मुळ दावा हा वादींनी प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापन व मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात वादींच्या कथनानुसार दावा मिळकत ही वादींचे वडील आणि प्रतिवादीचे पती यांच्या सामाईक मालकीची असल्याचे त्यांनी कथन केले आहे. ते दोघे सख्खे भाऊ होते. त्यांच्यामध्ये दावा मिळकतीचे वाटप त्यांच्या हयातीत किंवा त्यांच्या मृत्युनंतर आजपर्यंत झालेले नाही. प्रतिवादी ही वादी यांची चुलती असुन त्यांच्यात रक्तसंबंधाचे नाते पूर्वीदेखील होते. वादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकतीत वादींचे वडील आणि प्रतिवादीचे पती अर्धा-अर्धा

हिस्यावर वहिवाट करीत होते. परंतु, प्रतिवादीच्या पतीच्या मृत्युनंतर वादी यांनी तिचा सांभाळ केला कारण तिला मुलबाळ नव्हते. वादी प्रतिवादीच्या हिस्यातले अर्धे क्षेत्र आणि त्यांच्या हिस्यातले अर्धे क्षेत्रावर मालक म्हणुन वहिवाट करीत होते. वादींच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने दिनांक १९/०७/१९९६ रोजी मृत्यूपत्र वादींच्या नांवे त्यांचे एकमेव आणि भावी सरळ वारस म्हणुन लिहून ठेवलेले आहे. मृत्युपत्राचा अंमल तिच्या मृत्युनंतर होणार असल्याने वादींनी दावा मिळकतीचे मालक ताबडतोब मृत्यूपूर्वी करण्याचे असल्याने त्या कारणाकरीता प्रतिवादीने दिनांक १५/०९/१९९८ रोजी दावा मिळकतीवरील आपले हक्कसोड वादी क्र.३ च्या नांवे २१ तोळे सोने आणि बेळगांव येथील एका घराच्या मोबदल्यात लिहून दिल्याचे कथन केले आहे. वादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकतीवर त्यांचा मालकी आणि ताबा दिनांक १५/०९/१९९८ पासुन आजपर्यंत आहे. परंतु, प्रतिवादीने सन २०२२ पासुन वादी यांच्या दावा मिळकतीवरील मालकी व कब्जेवहिवाटीस हरकत केल्यामुळे प्रस्तुत दावा त्यांनी प्रतिवादीविरुध्द दाखल केला.

०८. प्रतिवादीने प्रस्तुत दाव्यातील संपुर्ण कथन नाकारले आणि दावा मिळकत वादींचे वडील आणि तिचे पतीची कधीही सामाईक मालकीची नव्हती तसेच तिने कधीही कोणतेही मृत्युपत्र दिनांक १९/०७/१९९६ रोजी वादींच्या लाभात लिहून दिलेले नाही. तसेच, दावा मिळकतीवरील आपले हक्कसोडपत्र दिनांक १५/०९/१९९८ रोजी वादी क्र.३ च्या लाभात केलेले नाही. वादींनी दावा मिळकतीवरील तिच्या पतीच्या मृत्युनंतर येणारा कायदेशिर हक्क तिच्यापासुन बळकावण्यासाठी प्रस्तुतचा दावा खोटे आणि बनावट कागदपत्रे दाखल करुन दाखल केल्याचे कथन केले.

०९. प्रस्तुत दाव्यात वादींनी दिलेला निशाणी क्र.५ वरील अर्ज दिनांक ३०/११/२०२२ रोजी या न्यायालयाने नामंजुर केलेला आहे. त्यानंतर, वादींनी दावा मिळकत पैकी सि.स.क्र.१३१४ मधील आपल्या अर्धा हिस्यावर वादी यांनी अतिक्रमण करुन घर बांधणीचे काम सुरु केल्यामुळे तिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अभिलेखावर दाखल जमीन मिळकतचा ७/१२ उतारा आणि

सि.स.क्र.१३१४ चा घरठाण पत्रकाचा उतारा पाहिले असता त्यावर प्रतिवादी आणि वादींची एकत्रीत नांवे आहेत. त्यावरुन, वादी आणि प्रतिवादी दावा मिळकतीचे सहमालक असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. वादींनी प्रस्तुत दाव्यात तथाकथीत मृत्युपत्र तसेच हक्कसोडपत्राचा उल्लेख केलेला आहे. परंतु, निशाणी क्र.५ कडे पारीत आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये न्यायालयाने प्रतिवादीच्या मृत्युनंतर तथाकथीत मृत्युपत्राचा अंमल होण्याचे नमुद केले आहे. तसेच, मृत्युपत्र खरे आहे किंवा खोटे हे दाव्याच्या गुणदोषावर निर्धारित होणार आहे. वादींच्या म्हणण्यानुसार हक्कसोडपत्र प्रतिवादीने वादी क्र.३ च्या लाभात दावा मिळकतीच्या संदर्भात लिहून दिलेले आहे, परंतु त्या आदेशामध्ये हक्कसोडपत्र नोंदणीकृत नाही. त्यामुळे, दावा मिळकतीचे अधिकार वादींना हस्तांतरीत होणार नाहीत असे निष्कर्ष नोंदविलेले आहेत. थोडक्यात, वादींनी प्रस्तुत दाव्यात मृत्युपत्र आणि हक्कसोडपत्राच्या बाबत कथन केले, पण त्याची शाबीती पुराव्याद्वारे होणार आहे. तत्पुर्वी, सि.स.क्र.१३१४ ज्याच्यावर सहमालक म्हणुन आजरोजी प्रतिवादीचे देखील वादींसोबत नांव नमुद आहे. त्यावरुन, तिचा त्या जमीनीवर अधिकार आहे. दावा मिळकतीत प्रतिवादीला मुस्लीम कायद्यानुसार किती हिस्सा येणार याचा निर्णय पुराव्याअंती निश्चित होणार आहे. त्यापुर्वी, जर दावा मिळकत सि.स.क्र.१३१४ वर होणारे बांधकाम जर थांबविले नाही तर निश्चितपणे त्याचे मुळ स्वरुप बदलणार आहे. त्याचे परिणाम म्हणजे प्रतिवादीच्या हिस्यात येणारे क्षेत्रापासुन तिला वंचित राहावे लागणार आहे किंवा दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. सबब, तात्पुरता मनाई हुकूम मागणीनुसार देणे न्यायोचित आहे. प्रतिवादीने तिची बाजु सकृतदर्शनी शाबीत केली आहे. न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने आहे. अशा परिस्थितीत मनाई हुकूम न दिल्याचे प्रतिवादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, मी वरील कारणामुळे प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष 'होकारार्थी' देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ४ करीताः</u>**-

१०. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता, प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष

नोंदविण्यासाठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील परिशिष्ट १ मध्ये नमुद मिळकतीमध्ये वादी यांनी कोणत्याही प्रकारचे कसलेही बांधकाम करु नये. तसेच, प्रतिवादीच्या मालक नात्याच्या कब्जेवहिवाटीस वादी अथवा तर्फे इसम यांनी कोणत्याही प्रकारची हरकत व अडथळा करु नये असा त्यांचेविरुध्द प्रस्तुत दाव्याच्या अंतिम निकालापावेतो सत्वर तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

०३. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.03.23 10:55:54 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १८/०३/२०२६.